प्रेस नोट

चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशन

प्रति,

दिनांक:- ०३/०७/२०२५

संपादक

-------------------------

दिनांक २९/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेच्या दरम्यान कन्नड घाटात एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत संशयास्पदरित्या घातपात केलेले मिळुन आले होते. त्यावरुन चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशनला आकस्मात मृत्यु दाखल करण्यात आला होता. सदर मयताचे प्रेताची ओळख पटेल असे कोणताही पुरावा आढळुन आला नव्हता त्यामुळे सदर मयताची ओळख पटवणे हे मोठे आव्हान होते. सदर मयताची ओळख पटविण्यासाठी पोलीसांनी त्याचे अंगावरिल चिज वस्तु तसेच गोंधलेले निशानी यांचे तपास यादी बनवुन सोशल मिडियावर टाकुण ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता सदर मयत जगदीश जुलाल ठाकरे रा. मोरदड ता. जि. धुळे येथील असल्याचे निष्पन्न झाले व त्याचे हरविल्याबद्दल धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे मिसिंग दाखल करण्यात आली होती सदर प्रकरणाचे अनुषंगाने मयताची पत्नी अरुणा जगदीश ठाकरे यांनी पोलीस स्टेशनला येवुन फिर्याद दिली की राजकिय वैमनस्यातुन मोरदड गावातील शुभम सावंत, अशोक मराठे व एका अनोळखी तरुणाने मिळुन त्यांना राहते घरुन वाढदिवसाला जाण्याचा बहाणा करुन घेवुन गेले व त्याचा खुन करुन कन्नड घाटात टाकुन दिले आहे अशी फिर्याद दिल्याने चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशनला भाग - ५ गु.र.नं. १९६/२०२५ बीएनएस कलम १०३(१) सह अॅट्रासिटी अक्ट अन्वये तीन आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे पुढील तपासात तात्काळ बारा तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखा जळगांव तसेच चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशन यांचे पथकाने आरोपीतांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिलेली असुन त्यांनी सदर मयताचा गोळी मारुन खुन केल्याचे निष्पन्न झालेले आहे. व गुन्ह्याचा पुढील तपास श्री. विनायक कोते उपविभागीय पोलीस अधिकारी हे करित आहेत.

सदरची कामगीरी ही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधिक्षक सो. जळगांव, श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधिक्षक सो. चाळीसगांव परिमंडळ, श्री. विनायक कोते, उपविभागीय पोलीस अधिकारी सो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार, पोउपनि प्रदिप शेवाळे, पोउपनि राहुल राजपुत व चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशन, चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन कडील पोलीस स्टाफ तसेच स्थानिक गुन्हे शाखा जळगांव कडील पोउपनि शेखर डोमाळे, पोकॉ महेश पाटील, भुषण शेलार, चालक बाबासाहेब पाटील अशांनी केली आहे.

कळावे,

पोलीस निरीक्षक
चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशन

